# राजर्षी शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या विचार व कार्यांची तुलना

प्रा.उदयकुमार नारायण लाड, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी–कोतोली ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर.
डॉ. एस. बी. फड, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग, नेताजी सुभाषचंद्र कॉलेज, नांदेड.

**प्रस्तावना.** छत्रपती शाहूंच्या व महाराजा सयाजीराव जीवनचरित्रामध्ये अनेक महत्त्वाचे प्रसंग व घटना व त्यावर त्यांनी दिलेला प्रतिसाद यातून त्यांची सामाजिक तळमळ व्यक्त होते. छत्रपती शाहूंना 'रयतेचा राजा' हा महासन्मान त्यांनी आपल्या कृतीतून मिळवलेला होता. सातत्याने जातीयवादी, धर्मांध कंपूच्या छळवादातून तत्कालीन समाज वेठीला धरलेला असताना अशा ब्राह्मणशाही विरोधात ठामपणे उभे राहण्याचे धाडस शाहू महाराजांनी दाखविले. जे वेदोक्त की पुराणोक्त प्रकरण निर्माण झाले त्याची परिणती म्हणून शाहूंनी सामाजिक परिवर्तनास आपली शक्ती, धन व वेळ दिला. सयाजीराव महाराज १८८१ ला गादीवर आले. १९३९ पर्यंत या राजाने सलग ५८ वर्षे राज्य केले. बडोद्याचे प्रशासन देशभरासाठी आदर्श बनवले होते. कुटुंबप्रमुख जसा कुटुंबातील सर्व गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो तसेच राजाने आपल्या जनतेच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. या भावनेतून सयाजीराव गायकवाड महाराजांनी पाणीपुरवठा, दानधर्म, धर्मशाळा, शिक्षणप्रसार, आरोग्य सेवा, स्वच्छते विषयक योजना, फौजदारी व दिवाणी गुन्हेगारीचा निवाडा करण्याविषयी कायदे केले. छत्रपती शाहू व सयाजीराव हे रयतेच्या पैशावर हौसमौज करणारे गुलछबू राजे नव्हते. रयतेकडून मिळणारा शेतसारा आणि इतर करांचे उत्पन्न हे लोककल्याणासाठीच वापरण्याचे सूत्र आयुष्यभर त्यांनी पाळले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या सामाजिक–राजकीय सुधारणात महाराजा सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू छत्रपती या दोन लोकोत्तर राजांचे फार मोठे योगदान आहे. बडोद्यातील बहुतांश प्रजा शेतकरी होती. शेती हा मुख्य व्यवसाय होता. शेतीसंबंधी पहिला निर्णय घेतला. शेती भूमापन व पाहणी (Land Survey Settlement) हे नवे खाते सुरु केले. जमिनीची मोजणी करुन शेतकऱ्याच्या उत्पन्नानुसार नव्याने शेतसारा आकारणी केली. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, गाव तेथे ग्रामपंचायत आणि पंचायतींना निर्णय घेण्याचे अधिकार, शाळा सुटलेल्या मुला–मुलींची साक्षरता टिकविण्यासाठी गाव तेथे वाचनालय, पाठयपुस्तकांची निर्मिती, शेती–पाण्याच्या सोई, रस्ते–धर्मशाळांची बांधणी, मोफत आरोग्यसेवा ही जनकल्याणाची कामे कायदे करुन प्राधान्याने केली. बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाह, सार्वजनिक ठिकाणी व मंदिरात सर्व जातींना प्रवेश, पुरोहितांसाठी कायदा, उत्तम न्यायव्यवस्था, पत्नी–मुलीस कुटुंबाच्या मिळकतीत हक्क हे जकल्याणाचे कायदे केले. या सामाजिक, धार्मिक, नैतिक आणि प्रशासकीय सुधारणेसोबत साहित्य, कला क्षेत्रात लक्षणीय काम केले. साहित्यिक, कलावंत चित्रकार, संगीतकार आणि शिल्पकारांना राजाश्रय दिला. सयाजीराव गायकवाडांनी राज्यकारभार होती येताच पहिल्या दहा वर्षात ही सगळी कामे केल्याने देशभर बडोदा राज्यकारभाराची चर्चा सुरु झाली.

कोल्हापूरात शाहू छत्रपतींनी १९०२ साली मागासवर्गीयांना ५० टक्के नोकऱ्यातील आरक्षणाचा क्रांतिकारी निर्णय घेतला. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, लोकशाही कारभारासाठी ग्रामपंचायतींची स्थापना, अस्पृश्यांना दरबारात नोकरी देणे, आंतरजातीय व धर्मीय विवाह नोंदणी, महिलांसाठी काडीमोड कायदा, बलुतेदारी रद्द करणे, गोबंदी हुकूम, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे या सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांचे कायदे कोल्हापूरमध्ये केले. महाराजा सयाजीराव गावकवाडांना शाहू छत्रपती अगोदर राज्य करण्याची संधी लाभल्याने त्यांच्या आधी पहिल्या दहा–बारा वर्षात हिंदुस्थानात सर्वार्थाने अग्रणी ठरतील अशी गोष्टी त्यांनी बडोद्यात केल्या. यातील काही समाजोपयोगी व कल्याणकारी योजना शाहू छत्रपतींनी कोल्हापूर संस्थानात समर्थपणे राबविल्या. कोल्हापूर संस्थानचा भौगोलिक विस्तार केवळ एका जिल्हयापुरताच होता, तर बडोदा राज्याचा विस्तार कोल्हापूरच्या तुलनेने चार–पाच पटीने मोठा होता. याचाही फायदा बडोद्यात अनेक गोष्टी करताना सयाजीरावांना होऊ शकला. (जाधव रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, (२०१६):७९१)

शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाडांची जीवनदृष्टीही सुसंगत आणि सर्वस्पर्शी होती. समाजजीवनाची विविध अंगे परस्परावलंबी व परस्परपोषक असतात. म्हणून सर्वांगीण

सुधारणेची कास धरणाऱ्यांना धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा सर्व क्षेत्रांत एकदमच पावले उचलावी लागतात. (पवार जयसिंगराव, (२०१९):१२५९) शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाडांना याची कल्पना होती त्यांनी ती उचलली.

**छत्रपती शाहू व महाराजा सयाजीराव यांच्या व्यक्तीमत्वाची तुलना**

महाराजा सयाजीराव आणि शाहू छत्रपती या दोन युगपुरुषांचा बराचसा कालखंड समकालीन असा होता. शाहू छत्रपती २६ जून १८७४ ला जन्मले. १८ मार्च १८८४ साली दहाव्या वर्षी त्यांचे दत्तकविधान आणि राज्यारोहण झाले. शिक्षणानंतर १८९४ साली विसाव्या वर्षी त्यांच्या हाती प्रत्यक्ष राज्यकारभार आला आणि आजाराने ६ मे १९२२ साली त्यांचे दु:खद निधन झाले. शाहू छत्रपती ४८ व्या वर्षी गेले. केवळ अठ्ठावीस वर्ष ते राज्यकारभार करु शकले. (भांड बाबा, (२०१७),खंड १२:५२६) सयाजीरावांचा जन्म ११ मार्च १८६३ ला झाला. ते शाहू छत्रपतीहून अकरा वर्षांनी मोठे होते. २७ मे १८७५ साली वयाच्या बाराव्या वर्षी सयाजीरावांचे दत्तकविधान आणि राज्यारोहण झाले. सहा वर्षांच्या शिक्षणानंतर २८ डिसेंबर १८८१ साली राज्याधिकारप्राप्ती झाली आणि प्रदीर्घ आजारानंतर ६ फेब्रुवारी १९३९ साली शहात्तराव्या वर्षी सयाजीरावांचे देहावसान झाले. सुदैवाने सयाजीरावांना चौसष्ट वर्षांचा प्रदीर्घ काळ राजगादीवर राहण्याची संधी लाभली. याकाळात बडोद्याचे प्रशासन देशभरासाठी आदर्श बनवले होते.

सयाजीराव आणि शाहू दोघेही दत्तकपुत्र म्हणून बडोदा आणि कोल्हापूरच्या गादीवर आले. नाशिक जिल्हयातील कवळाणा गावच्या काशीराम गायकवाडांचा बारा वर्षांचा गोपाळ योगायोगाने बडोद्याचा राजा बनला. खेडयातील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबासारखी परिस्थिती होती आणि गोपाळला तर शिक्षणाचा गंधही नव्हता. याउलट शाहू छत्रपती हे कागलच्या सुस्थितीतील सरदार घराण्यातील पुत्र होते. दत्तकविधान होताच या दोन्ही युवराजांच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. सयाजीरावांना भाऊ मास्तर आणि ब्रिटिश शिस्तीत वाढलेले मि. इलियट या शिक्षकांचे उत्तम मार्गदर्शन लाभले तर शाहूंना रघुनाथ सबनीस आणि फ्रेजर हे चांगले गुरू मिळाले. सुदैवाने सयाजीरावांना शाहू छत्रपती अगोदर तेरा वर्षे आणि नंतर सतरा वर्षे राज्यकारभार करण्याची संधी लाभली.

राज्यकारभार हाती येताच सहाव्या वर्षी १८८७ ला सयाजीरावांनी पहिला विलायत प्रवास केला. त्यावेळी ते चोवीस वर्षांचे होते. अर्ध्या जगावर राज्य करणारे इंग्लंड बघण्याची त्यांना उत्सुकता होती. त्यांचे गुरु मि. इलियटसर बरोबर होते. इलियट यांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्या विलायत प्रवासाची नीट आखणी केली होती तर छत्रपती शाहूंनी १९०२ ला विलायत प्रवास केला. या प्रवासात युरोपातील अनेक देशांना भेटी देवून तेथील सुधारणा औद्यागिकरण, कृषी विकास, विज्ञानवाद याचे डोळसपणे अध्ययन केले. सयाजीरावांनी युरोपातील शाळा, कॉलेजेस, उद्योगधंदे, प्रगती आणि सामाजिक सुधारणांचा बारकाईने अभ्यास केला. स्वत: नोंदी घेतल्या. बरोबरच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या. जे—जे इथे चांगले दिसले, वाटले, ते—ते आपल्या बडोदा राज्यात सुरू करायचे. या विचाराने सयाजीराव बडोद्यात परतले. पहिल्या विलायत भेटीचा अहवाल तयार करविला. प्रवास खर्चासह वृत्तांत छापून घेतला. विलायतेतील रस्ते, बागा, इमारती बांधणारे तज्ज्ञ तसेच शिक्षण, ग्रंथालय विषयातील मंडळींना ते टप्प्याटप्प्याने बडोदा सेवेत बोलावू लागले. शाहू छत्रपती विलायत प्रवासात युरोपातील शाळा, कॉलेज, उद्योगधंदे विकास व सामाजिक सुधारणा तसेच खेळाच्या सुविधा, शेती व पाणीपुरवठा, बांधकाम इत्यादी क्षेत्रातील विकास व कौशल्य यांचा बारकाईने अभ्यास केला. भारतात परतल्यावर कोल्हापूर संस्थानात या सोई सुविधा व सुधारणा करण्याचा चंग बांधला. आपल्या संस्थानाच्या अल्प उत्पन्नात त्या पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला.

बडोद्यातील बहुतांश प्रजा शेतकरी होती. शेती हा मुख्य व्यवसाय होता. शेतीसंबंधी पहिला निर्णय घेतला. शेती भूमापन व पाहणी (Land Survey Settlement) हे नवे खाते सुरू केले. जमिनीची मोजणी करून शेतकऱ्यांचा उत्पन्नानुसार नव्याने शेतसारा आकारणी केली. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, गाव तेथे ग्रामपंचायत आणि पंचायतींना निर्णय घेण्याचे अधिकार, शाळा सुटलेल्या मुला—मुलींची साक्षरता टिकण्यासाठी गाव तेथे वाचनालय, पाठयपुस्तकांची निर्मिती, शेती—पाण्याच्या सोई, रस्ते—धर्मशाळांची बांधणी, मोफत आरोग्यसेवा ही जनकल्याणाची कामे कायदे करून प्राधान्याने केली, बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाह, सार्वजनिक ठिकाणी व मंदिरात सर्व जातींना प्रवेश, पुरोहितांसाठी कायदा, उत्तम न्यायव्यवस्था, पत्नी—मुलीस कुटुंबाच्या मिळकतीत हक्क हे

जनकल्याणाचे कायदे केले. या सामाजिक, धार्मिक, नैतिक आणि प्रशासकीय सुधारणेसोबत साहित्य, कला क्षेत्रात लक्षणीय काम केले. साहित्यिक, कलावंत, चित्रकार, संगीतकार आणि शिल्पकारांना राजाश्रय दिला. सयाजीराव गायकवाडांनी राज्यकारभार हाती येताच पहिल्या दहा वर्षांत ही सगळी कामे केल्याने देशभर बडोदा राज्यकारभाराची चर्चा सुरू झाली.

कोल्हापूरात शाहू छत्रपतींनी १९०१ साली मागासवर्गीयांना ५० टक्के नोकऱ्यातील आरक्षणाचा क्रांतिकारी निर्णय घेतला, सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण लोकशाही कारभारासाठी ग्रामपंचायतींची स्थापना, अस्पृश्यांना दरबारात नोकरी देणे, आंतरजातीय व धर्मीय विवाह नोंदणी, महिलांसाठी काडीमोड कायदा, बलुतेदारी रद्द करणे, गोबंदी हुकूम, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे या सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांचे कायदे कोल्हापूरमध्ये केले. महाराजा सयाजीराव गायकवाडांना शाहू छत्रपती अगोदर राज्य करण्याची संधी लाभल्याने त्यांच्या आधी पहिल्या दहा—बारा वर्षांत हिंदुस्थानात सर्वार्थाने अग्रणी ठरतील अशा गोष्टी त्यांनी बडोद्यात केल्या. यातील काही समाजोपयोगी व कल्याणकारी योजना शाहू छत्रपतींनी कोल्हापूर संस्थानात समर्थपणे राबविल्या. कोल्हापूर संस्थानचा भौगोलिक विस्तार केवळ एका जिल्हयापुरता होता, तर बडोदा राज्याचा विस्तार कोल्हापूरच्या तुलनेने चार—पाच पटीने मोठा होता. याचाही फायदा बडोद्यात अनेक गोष्टी करताना सयाजीरावांना होऊ शकला. (भांड बाबा, खंड १२, (२०१७):५२७,५२८)

१८७५ साली स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाचा हिंदू धर्मातील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेला विरोध होता. श्री. सयाजीराव गायकवाड व शाहू महाराजांच्या विचारांवर आर्य समाजाच्या सामाजिक समतेच्या विचारांचा प्रभाव होता. आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्यामुळे दोघेही भारावले होते. श्री. सयाजीराव महाराजांना अस्पृश्यता निवारणाच्या कार्याबद्दल आर्य समाजाने 'पतित पावन' अशी पदवी देऊन त्यांचा बहुमान केला होता. बडोदा संस्थानातील मंदिरे अस्पृश्यांना खुली केल्याबद्दल म. गांधींनी श्री. सयाजीराव महाराजांच्या कार्याची प्रशंसा केली होती. मानवी समता आणि प्रत्येक मनुष्यमात्रास वेदाधिकार या आर्य समाजाच्या उदात्त तत्त्वज्ञानामुळे श्री. शाहू महाराज आर्य समाजाकडे आकर्षिले गेले. जातिभेद मोडण्यासाठीही त्यांना आर्य समाजाचे तत्वज्ञान उपयुक्त वाटले. शाहू महाराजांनी आर्य समाजाकडे कोल्हापुरातील काही शैक्षणिक संस्था चालविण्यासाठी दिल्या होत्या. प्रतिगामी पुरोहितशाहीचे वर्चस्व मोडण्यासाठी श्री. शाहू महाराजांना आर्य समाजाचे जहाल विचार उपयुक्त वाटले. (भांड बाबा, खंड १२, (२०१७): १७५)

सयाजीराव महाराज व शाहू महाराजांनी शिक्षण, अस्पृश्यता, जातिव्यवस्था, कालबाहय धार्मिक रूढी व परंपरा, सामाजिक समता, प्रजेचे कल्याण तसेच स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांसंबंधी या दोन्ही प्रजाहितदक्ष राजांचा मानवतावादी दृष्टिकोन एकसारखा होता. कायद्याच्या मदतीने आणि आपल्या आदर्श वर्तनाने दोघांनीही त्यांना अभिप्रेत असलेली मानवी मूल्ये अमलात आणली. डॉ. आंबेडकरांना उच्च शिक्षण घेण्यासाठी सयाजीराव महाराज व शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथातील एक लेखक श्री. द्वा. भ. कर्णिक यांनी या संदर्भात आपल्या लेखात म्हटले की, "बडोद्याचे सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूरचे शाहू छत्रपती यांनी शिक्षणासाठी त्यांना अनुदान दिले नसते तर इंग्लंड—अमेरिकेत वास्तव्य करून सर्वोच्च पदव्याही त्यांना संपादन करता आल्या नसत्या.

तसे पाहिले तर शाहूमहाराजांनी जे जे केले ते ते सारे सयाजीराव महाराजांनी केले. इतकेच नव्हे तर त्यांच्यापूर्वीच केले. वेदोक्त सयाजीराव महाराजांनीच सुरू केले. शाहू महाराजांनी पुढे ते धसास लावले. सयाजीरावांनी आपल्या पंक्तीला अस्पृश्यांना घेतले. त्यांना नोकऱ्या दिल्या. आंबेडकरांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च केला; परंतु हे सारे केले ते अलिप्त वृत्तीने. आपल्या विशाल कार्यक्षेत्रातील आणि विशालतर जीवनातील केवळ एक भाग याच भावनेने आणि दृष्टीने. साहजिकच सयाजीरावांच्या सामाजिक किंवा जातीय कार्याचा गाजावाजा झाला नाही आणि त्यांच्यावर टीकेचा वर्षावही झाला नाही.याच्या उलट शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळ हे आपले एकमेव उद्दिष्ट मानले आणि त्या चळवळीत आपला प्राण ओतला. इतकेच नव्हे तर त्या चळवळीसाठी वेळवखत आला तर राजपद सोडण्याचीही तयारी केली.

या दोन राजर्षींच्या भूमिकांचा परिणाम असा झाला की बहुजन समाजाला सयाजीराव महाराज निराकार निर्गुण ब्रह्मसारखे भासले तर शाहू महाराज त्यांचे सगुण सावळे ब्रह्म झाले. एकाला नितांत आदर मिळाला. दुसऱ्याला अपूर्व प्रेम लाभले.

**छत्रपती शाहू व महाराजा सयाजीराव यांच्या सामाजिक विचार व कार्याची तुलना**

सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे १८८१ साली घेतली तर शाहू महाराजांनी १८९४ साली कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभारास सुरुवात केली. सयाजीरावांनी एकोणिसाव्या वर्षी व शाहू महाराजांनी विसाव्या वर्षी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेऊन पुरोगामी धोरण राबविण्यास सुरुवात केली. राजसत्तेला सामाजिक परिवर्तनाची तरफ समजून दोघांनीही द्रष्टे राज्यकर्ते म्हणून नावलौकिक मिळविला. राज्याभिषेकाच्या वेळी दोघांनी काढलेल्या जाहीरनाम्यात विलक्षण साम्य आहे. सयाजीराव प्रजेला उद्देशून म्हणाले की, “आमची प्रजा संतुष्ट राहावी आणि उत्तरोत्तर तिच्या सुखात वाढ व्हावी अशी आमची अंतकरणापासून इच्छा आहे.” शाहू महाराज म्हणाले, “आमची प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृध्दी व्हावी अशी आमची उत्कट इच्छा आहे.” जाहीरनाम्यानुसार लोकांचे कल्याण करून दोघेही ‘रयतेचे राजे’ झाले.

सामाजिक परिवर्तनाची लढाई फक्त शिक्षणाच्या प्रसारातून जिंकणे शक्य असल्याची दूरदुष्टी छत्रपती शाहू यांच्याकडे होती. यासाठी प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने व्हावा व आपले राज्य पुर्णपणे साक्षर व्हावे हा ध्यास त्यांनी घेतला. समाजातील विविध धर्माच्या विद्यार्थ्यांकरिता मुस्लीम बोर्डिंग, मराठा बार्डिंग, जैन बोर्डिंग स्थापन केले. जे पालक आपली मुले शाळेत पाठवणार नाहीत त्यांना दंड करणारे शाहू राजे एका प्रगत समाजाचे स्वप्न पहात होते. (पवार जे.के., (२०१८): १६३) छत्रपती शाहूंना हा वैचारिक समाज निर्माण करण्याचा ध्यास होता व त्यासाठी धर्मसत्तेला, धार्मिक विधीच्या ठेकेदारांना उघड आव्हान दिले. समाजातील दुर्बल घटकांना शिक्षण, रोजगार उपलब्ध होईल आणि सामाजिक सौख्य वाढेल यावर छत्रपती शाहूंनी भर दिला. (पवार जे.के., (२०१८):१६५)

समाजाचे कल्याण करणारा, सर्वांना समान न्यायहक्क व अधिकार मिळवून देणारा, जातीपातीच्या पलीकडे जाऊन माणसाकडे ‘माणूस’ म्हणून बघणारा हा राजा. हिंदुस्थानची शांतता, प्रगती आणि भरभराट ह्या सर्व गोष्टी मागासवर्ग आणि दलितवर्ग यांच्या उन्नतीवर अवलंबून आहेत अशी त्यांची धारणा होती. सर्व राष्ट्रहितांचे एकीकरण व दृढीकरण करण्याची त्यांची इच्छा होती. अस्पृश्यवर्ग व मागासवर्गीय यांना दैन्याच्या चिखलातून बाहेर काढणे हे आपले पवित्र जीवितकार्य आहे आणि ते मानव जातीच्या बाबतीत आपले पवित्र कर्तव्य आहे अशी छत्रपती शाहू व महाराजा सयाजीराव गायकवाड यांची श्रध्दा होती.

शाहू महाराज व सयाजीराव महाराजांना महान आधुनिक विचारवंतांची मते अवगत होती आणि प्रत्येक जातीतील लोकांना शिक्षित करुन, राज्यशासनात त्यांच्या सेवांचा समावेश करुन आणि स्वत:च्या राज्यातील आणि आपल्या मनातील आणि वृत्तीतील अस्पृश्यतेला हद्दपार करुन त्यांनी अस्पृश्यतेवर आणि जातिव्यवस्थेच्या मूर्खपणावर उघड उघड धैर्याने हल्ला केला होता. याचा परिणाम ज्यांनी ईश्वराच्या आाणि संस्थानच्या सेवेत मक्तेदारी निर्माण केली होती आणि त्यायोगे प्रजेच्या मनाला आणि शरीराला गुलाम करुन टाकले होते, अशा सनातनी पुरोहितवर्गावर झाल्याशिवाय राहिला नाही. शाहू महाराज व सयाजीराव महाराजांनी ही गुलामगिरीची शृखंला अविचलित श्रध्देने आणि निर्भय पावलांनी आणि विचारांनी मोडून काढली.

२ एप्रिल १९१८ रोजी बडोदा येथे राजकन्या इंदुमतीदेवी यांच्या विवाहानिमित्त दिलेल्या मेजवानीमध्ये बोलताना सयाजीरावांनी कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी अत्यंज जातीतील लोकांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याची प्रशंसा केली होती. सयाजीराव महाराज व शाहू महाराज हे केवळ ब्राम्हणेतरांचे पुढारी होते, असे म्हणणे बरोबर ठरणार नाही. जातिपातीचा विचार न करता, भारतीयात एकतेचे आणि शक्तीचे प्रवर्तन करणारे आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांना उचलून धरुन सार्वजनिक न्यायाचे प्रवर्तन करणाऱ्या पुरोगामी लोकांचे ते पुढारी होते. दोहोनी आंतरधर्मिय, आंतरजातीय विवाहाचा कायदा केल्यामुळे उच्च व निच्च समजल्या जाणाऱ्या जातींमध्ये शेती व्यवहार व बेटीव्यवहार होऊ लागले. त्यामुळे जातींमधील अंतर कमी होण्यास मदत झाली. अनुलोम किंवा प्रतिलोम अशा कोणत्याही प्रकारच्या आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी बडोदा स्पेशल (सिव्हिल) ‘मॅरेज ॲक्ट’ हा कायदा संमत केला.

सयाजीराव आणि शाहू महाराज स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे महाराष्ट्रातील अग्रदूत होते. ते कामगार आणि शेतकऱ्यांना मी तुमच्यापैकी एक आहे, असे म्हणायचे. वृत्तपत्र हे नव्या युगातील एक महत्वाचे हत्यार आहे, हे लक्षात आल्यावर सयाजीराव आणि शाहू या दोघांनीही वृत्तपत्रे काढण्याला प्रोत्साहन दिले. हस्ते परहस्ते, प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष आर्थिक मदत केली. (मोरे सदानंद,

(२००७):३०३) जातीय शक्ती विरोधात छत्रपती शाहूंनी अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने लढा दिला. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाज चळवळीला राजाश्रय दिला. आपल्या दरबारात ब्राह्मणवर्गाने अनेक कुभांडे रचली. तरीही अशा उपद्रवी वातावरणात त्यांनी शेतकरी, कामगार, उद्योजक यांना प्रोत्साहित करत करवीर प्रांताचा आर्थिक पाया भक्कम केला. (पवार जे.के., (२०१८):१६३) धर्माने समुद्र पर्यटन निषिध्द मानले होते तरी सयाजीराव महाराजांनी १८८७ साली व शाहू महाराजांनी १९०२ साली समुद्र मार्गाने प्रवास केला. श्री. सयाजीराव गायकवाड महाराजांनी १८९३ साली व राजर्षी शाहू महाराजांनी १९१७ साली प्राथमिक शिक्षण मुलामुलींसाठी सक्तीचे व मोफत केले, अस्पृश्यता निवारण्यासाठी तसेच जातिभेद नष्ट करण्यासाठी दोघांनीही आपापल्या संस्थानात कायदे केले. शाहू महाराजांचा प्रभाव फक्त त्यांच्या संस्थानापुरता मर्यादित नव्हता. मागे उल्लेखिल्याप्रमाणे संपूर्ण देशातील लक्षावधी कामगार आणि शेतकरी यांचा ते बुलंद आणि विद्रोही आवाज होते. (पवार जयसिंगराव, (२०१९):१३००,१३०१)

महाराष्ट्राचे राजकारण आणि समाजकारण ढवळून काढणारे वेदोक्त प्रकरण ही फार महत्वाची बाब आहे. पण तसेच प्रकरण बडोद्यात अगोदर घडले होते व सयाजीरावांनी ते यशस्वीरीत्या पण शिताफीने हाताळले होते. स्वत:च्या वेदोक्ताचा प्रश्न त्यांनी उत्तरेकडील ब्राह्मणांच्याकडून यशस्वी रीतीने सोडवून घेतला. शाहू महाराजांच्या संदर्भात हाच वाद उद्‌भवला, तेव्हा सारा महाराष्ट्रच वेदोक्तमय होऊन गेला आणि आपल्या दृष्टीने महत्वाची गोष्ट म्हणजे त्याचा टिळकांशीही संबंध आला; तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय वातावरणावर त्याचा विलक्षण परिणाम झाला.

१८९६ साली सयाजीराव महाराजांनी आदेश जाहीर करून आपल्या कुटुंबातील धार्मिक विधी वेदोक्त पध्दतीने करण्यास सुरवात केली. जातीजातीमध्ये भेदभाव करणारी पुराणोक्त धर्मविधीची चाल बंद केली. राजवाडयात वेदोक्त पध्दतीने सर्व विधींचा अर्थसांगून धर्मविधी केले पाहिजेत असे निर्बंध घातले, जे ब्राह्मण सुधारणेस तयार नव्हते. त्यांची वतने काढून दुसऱ्यांना दिली. गुजराती पुरोहितांनी नमते घेतल्यामुळे वेदोक्त प्रकरणाने संस्थानात गंभीर स्वरूप धारण केले नाही. १९०१ साली मात्र कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांचे क्षत्रियत्व नाकारणाऱ्या पुरोहितांच्या सनातनी प्रवृत्तीविरुध्द प्रखर संघर्ष झाला आणि या समतेच्या लढयाने महाराष्ट्र ढवळून निघाला. श्री. सयाजीराव गायकवाड महाराज प्रवृत्तीने नेमस्त होते. परंतु शाहू महाराज हे जहाल व आक्रमक प्रवृतीचे असल्यामुळे पुरोहितांच्या नोकरशाहीवर त्यांनी प्राणघातक प्रहार केले.

छत्रपती शाहू महाराजांची व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपली संपत्ती (धन), शक्ती, ज्ञान आणि पद या सर्व गोष्टी त्यांचे थोर पूर्वज शिवाजी महाराज यांच्याप्रमाणे एक नवा शौर्यशाली, एकसंघ आणि सशक्त भारत करण्यासाठी समर्पित केल्या होत्या. एक प्रशासक म्हणून छत्रपती शाहू महाराजांची व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी नेहमीच आपल्या प्रजेच्या कल्याणाचा विचार केला. ते राज्यकर्ते असले तरी त्यांना वाटायचे की, संस्थानातील जनतेची सेवा करणे, हे आपले कर्तव्य आहे. त्यांनी जे जी गोष्ट केली, त्यात आपणास पुढील गोष्टी आढळतात.
१) खोलवर विचार २) त्यातून पध्दतशीर नियोजन ३) चैतन्य आणि खंबीरपणा ४) यथार्थता आणि वस्तुस्थितीचे आकलन ५) राज्यकारभाराच्या सूक्ष्मतम तपशिलांकडे पाहण्याची मनाची तप्तरता ६) प्रतिष्ठा आणि अनौपचारिकपणा यांचा दुमीळ संयोग ७) प्रजेच्या गरजांना प्रतिसाद.यशापयशावरुन महापुरुषांचे कधी मूल्यांकन करता येत नाही. उदात्त उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केला गेलेला संघर्षच महापुरुषांची निर्मिती करत असतो. छत्रपती शाहू महाराजांची व महाराजा सयाजीराव गायकवाड यांची राजवट म्हणजे असंख्य घटना, संघर्ष आणि अडचणींचा इतिहास होय. (पवार जयसिंगराव, (२०१९):३९८,३९९) छत्रपती शाहू महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड प्रतिगामी वा स्थितिवादी मुळीसुध्दा नव्हते. आपल्या पुरोगामी परिवर्तननिष्ठेशी प्रतारणा होईल असे काही त्यांच्या हातून कधीच झालेले नाही. ते वास्तवलक्षी आणि व्यवहारवादी अवश्य होते. पण त्यासाठी तत्त्वांशी तडजोड करण्याची त्यांची कधीच तयारी नव्हती. (पवार जयसिंगराव, (२०१९):४०३)

शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात लोकहितवादी व फुले, एवढेच नव्हे; तर शिवाजी महाराज व चाणक्य असे चार महापुरुष अवतीर्ण झाले होते, असा आपला अभिप्राय व्यक्त करुन घाटे विठ्ठल शाहू महाराज व सयाजीराव महाराज या दोन राजपुरुषांच्या व्यक्तित्वाची तुलनात्मक मीमांसा करतात आणि आपला निष्कर्ष नोंदवतात,'शाहू महाराज आणि सयाजीराव महाराज हे दोघे राजपुरुष बरेचसे समकालीन. दोन्हीही मोठी माणसे. परंतु दोघात फार फरक होता. पहिले दहा—दहा तास उन्हातान्हात

घोडयावर बसून डुकरांचा माग काढायचे तर दुसरे दहा—दहा तास नव्या नव्या शास्त्रांवरील ग्रंथांचे श्रवण करीत जागरण करायचे. एखादा प्रश्न डोकावला रे डोकावला की, पहिले त्याला ताबडतोब कार्यवाहीत आणायचे तर दुसरे स्वत:चे मत निश्चित केले असले तरी चार तज्ञांची कमिटी नेमायचे, त्यांना पुरेसा वेळ द्यायचे, त्यांचा अहवाल सावकाश वाचायचे, चर्चा करायचे आणि मगच निर्णय घ्यायचे. सयाजीरावांपाशी जन्म काढलेले माझे मित्र मला थट्टेने नेहमी सांगत, 'एखाद्या माणसाने राजवाडयात येऊन, समोर उभे राहून महाराजांना शिव्या दिल्या असल्या तर त्याने खरेच शिव्या दिल्या का, दिल्या असल्यास त्या किती वाईट होत्या, शिव्या वाईट असल्यास सदर इसमास काय शिक्षा करावी, ठरविण्यासाठी महाराजांनी एखादी कमिटी नेमली असती'. (घाटे विठ्ठल, (१९६१):२७८)

पहिले कर्मवीर होते तर दुसरे तत्त्वचिंतक. पहिले कर्मठ मराठा हिंदू होते, क्षत्रियत्वाचा अभिमान बाळगणारे, मरेपर्यंत सकाळी भक्तिभावाने विलायतच्या थंडीतसुध्दा शिवपूजा करणारे होते, तर दुसरे अज्ञेयवादी; बुध्दीखेरीज कशावरच विश्वास न ठेवणारे, परंतु लोकाराधनेसाठी सारे काही करणारे आणि करविणारे होते. पहिले कट्टर ब्राम्हणेतर तर दुसरे भारतीयत्वाच्याही पलीकडे जाऊन विश्वमानव बनलेले, विश्वसंस्कृतीशी तादात्म्य पावलेले आणि भारतीय संस्कृतीकडे तटस्थ वृत्तीने पाहणारे होते. पहिल्याने आपले संस्थान क्वचितच सोडले तर दुसरे आपल्या संस्थानातच नव्हे, तर आपल्या देशात हिवाळयाच्या मोसमाखेरीज क्वचित राहिले. मात्र अस्मानात उडणाऱ्या घारीची नजर खालच्या घरटयातल्या पिलांवर असते, तशी सयाजीरावांची नजर सदैव आपल्या प्रजेकडे होती. सयाजीराव कोणाच्याच जवळ आले नाहीत. कोणालाच त्यांनी जवळ केले नाही. बायकोला, मुलांना, नातवांना, मित्रांना. ते स्वयकेंद्रित होते, 'इंट्राव्हर्ट' होते; तर शाहू महाराज 'एक्स्ट्राव्हर्ट' होते. इतका मोठा फरक होता परंतु दोघेही आपल्या तेजाने तळपले आणि भारताचे भूषण झाले. या दोन राजर्षींच्या भूमिकांचा परिणाम असा झाला की, बहुजन समाजाला सयाजीराव महाराज निराकार, निर्गुण ब्रम्हासारखे भासले; तर शाहू महाराज त्यांचे सगुण सावळे ब्रम्ह झाले. एकाला नितांत आदर मिळाला, दुसऱ्याला अपूर्व प्रेम लाभले.

महाराजा सयाजीराव व शाहू महाराजांनी अनेक व्यक्ती व संस्थाना मदत व सहकार्य केले. म. फुले, डॉ. आंबेडकर, म. गांधी, लो. टिळक, न्या. रानडे, ना. गोखले, लाला लजपतराय, महर्षी शिंदे, भाऊराव पाटील, पंडित मालवीय, योगी अरविंद, रियासतकार सरदेसाई या काही व्यक्ती आणि शेकडो संस्थांना सर्वार्थानं दोघांनी मदत केली. यातील काही लाभार्थी सयाजीरावांचे तर काही शाहू महाराजांचे होते.

**शाहू महाराज व महाराजा सयाजीराव या दोन लोकोत्तर व्यक्तिमत्त्वातील साम्य—भेद**

सयाजीरावांनी स्वत: शिकून शिक्षणाच्या माध्यमातून ब्रिटिश अमदानीत धर्मनिरपेक्ष आधुनिक लोकशाही मूल्यांचा पाठपुरावा करणारा राजा अशी आपली स्वत:ची ओळख निर्माण केली. चक्रवर्ती राजगोपालाचारी म्हणतात,'आधुनिक हिंदुस्थानात दोन खरे राजे झाले आहेत, ते आहेत शाहू महाराज आणि सयाजीराव.' इतिहासाचार्य वि. का. राजवाडयांनी महाराष्ट्रातील शंभर वर्षांतील कर्तृत्ववान व्यक्तींची यादी केली. यात पहिले नाव होते सयाजीराव गायकवाडांचे. महात्मा गांधींनी येरवडयाच्या सेंट्रल जेलमधून सयाजीरावांना लिहिलेल्या पत्रात म्हटलंय, "महाराज सयाजीराव गायकवाडांनी बडोदा संस्थानात हरिजनासाठी शिक्षणाची दारं उघडली आणि अस्पृश्यतेचा कलंक दूर करून भारतात प्रथमच कायद्याने अंमलबजावणी केली"

महाराजा सयाजीराव आणि राजर्षी शाहू हे दोघेही समाजपुरुष लोककल्याण आणि समाजसुधारणांसाठी उत्तम प्रशासनाचा आदर्श होते. दोघेही उदार होते, बुध्दीवादी होते, नवीन प्रयोग करण्यास मागे—पुढे पाहत नसत. सयाजीरावांचा मदतीचा हात अधिक मोकळा होता. वेगवेगळया जातींच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाचा शाहूचा प्रयत्न हे चांगले उदाहरण सांगता येईल. शाहू छत्रपत्तींचे ब्रिटिश सरकारांशी असलेले मित्रत्वाचे संबंध आणि वागणे त्यांच्या समतोल व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवते. या उलट एक व्यासंगी, विद्वानांच्या संगतीत वावरणारे आणि जगभर फिरलेल्या स्वाभिमानी सयाजीराव महाराज ब्रिटिशांची रणनीती पुरती ओळखूण आयुष्यभर संयमाने सरकारशी संघर्ष करत राहिले. हे करत असताना त्यांनी रयतेच्या कल्याणाचा चोवीस तास ध्यास घेतला. साहित्य, कला, संस्कृती, उद्योग, शेती आणि प्रशासनात बडोदा हे हिंदुस्थानातील अग्रगण्य संस्थान

बनवले. शाहू महाराज यांच्यापूर्वी महात्मा फुले व सत्यशोधक चळवळीकडे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी लक्ष दिले.

राजर्षी शाहू आणि महाराजा सयाजीरावांची पिंड व प्रकृती मूळत: भिन्न होती. राजर्षी शाहू एखादी गोष्ट करताना एकदम धडक मारत, टक्कर घेऊन प्रतिस्पर्ध्याला चारीमुंडी चीत करण्याची पहिलवानी शक्ती वापरत. याउलट सयाजीराव महाराज एखादा निर्णय घेतानाचार तज्ज्ञांचे मत घेत, त्यांच्याकडून अहवाल मागवत. स्वत: त्याचा विचार करून समतोल निर्णय घेत. तरीसुध्दा विद्या प्रसारक चळवळीचे सयाजीराव पहिले आश्रयदाते (Patron) झाले. पुढे सयाजीरावांच्या कार्यात शाहू महाराजांनी भर घातली. सयाजीरावांचे धोरण सामिलकीचे असल्याने कट्टर हिंदुत्ववादी, सावरकरवादी, फुल्यांचे सत्यशोधक, आर्यसमाजाचे, बुध्दिस्ट आणि पुरोगामी विचारांची माणसे त्यांच्याकडे नोकरीला होती. या सर्वांना बरोबर घेऊन सयाजीराव महाराजांनी सामिलकीच्या धोरणाचा पुरस्कार केला, महाराष्ट्रालाच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाला गौरव आणि अभिमान वाटावा असे या दोघांचे कार्य आहे. (जाधव रमेश, 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', (२०१६):८०२)

**सारांश**

महाराजा सयाजीराव आणि राजर्षी शाहू हे दोघेही समाजपुरुष लोककल्याण आणि समाजसुधारणांसाठी उत्तम प्रशासनाचा आदर्श होते, बुध्दिवादी होते, नवीन प्रयोग करण्यास मागे—पुढे पाहत नसत. सयाजीरावांचा मदतीचा हात अधिक मोकळा होता. वेगवेगळया जातींच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाचा शाहूंचा प्रयत्न हे चांगले उदाहरण सांगता येईल. शाहू छत्रपतींचे ब्रिटिश सरकारांशी असलेले मित्रत्वाचे संबंध आणि वागणे त्यांच्या समतोल व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. याउलट, एक व्यासंगी, विद्वानांच्या संगतीत वावरणारे आणि जगभर फिरलेल्या स्वाभिमानी सयाजीराव महाराज ब्रिटिशांची रणनीती पुरती ओळखून आयुष्यभर संयमाने सरकारशी संघर्ष करत राहिले. हे करत असताना त्यांनी रयतेच्या कल्याणाचा चोवीस तास ध्यास घेतला. साहित्य, कला, संस्कृती, उद्योग, शेती आणि प्रशासनात बडोदा हे हिंदुस्थानातील अग्रगण्य संस्थान बनवले. शाहू महाराज यांच्यापूर्वी महात्मा फुले व सत्यशोधक चळवळीकडे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी लक्ष दिले.

महाराजा सयाजीराव आणि राजर्षी शाहू महाराजांची भूमिका ही तत्त्वचिंतकाची नसून कृतिशील समाजसुधारकांची होती. आपल्या सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणण्यावर त्यांनी आपले सारे लक्ष केंद्रित केले होते. मात्र आपली भूमिका विशद करताना त्यांनी वेळोवेळी जे विचार व्यक्त केले आहेत, ते नि:संशय मर्मग्राही व मोलाचे आहेत. ज्या दलितांच्या प्रश्नाकडे त्यांनी तत्परतेने लोकांचे लक्ष वेधले, तो अजूनही पूर्णपणे सुटलेला नाही. सामाजिक न्याय व समता या तत्त्वांचा त्यांनी अखेरपर्यंत हिरिरीने पाठपुरावा केला. पण त्यादिशेने स्वातंत्र्योत्तरकाळातही आपली विशेष प्रगती झाली आहे, असे म्हणता येत नाही. सामाजिक विषमतेच्या निर्मूलनाचा प्रश्न हा अत्यंत बिकट व गुंतागुंतीचा होऊन राहिला आहे. त्या प्रश्नाचे खरे स्वरुप ध्यानात घेऊन तो सोडविण्याची दिशा स्पष्ट होण्यासाठी महाराजांच्या कार्यामागील प्रेरणांचे व विचारांचे वस्तुनिष्ठ ऐतिहासिक दृष्टीने मूल्यमापन करण्याची, त्यांचे आगळेपण व मर्यादा समजून घेण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची**


१. भांड बाबा, (२०१७), 'महाराजा सयाजीराव गायकवाड गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२', चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.
२. घाटे विठ्ठल दत्तात्रय, (१९६१), 'असे दिवस होत', मौज प्रकाशन, मुंबई.
३. जाधव रमेश, (संपा), (२०१६), 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', महाराष्ट्र शासन चरित्र साधने प्रकाशन समिती मंत्रालय, मुंबई.
४. कीर धंनजय, (१९७०), श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
५. मोरे सदानंद, (२००७), 'लोकमान्य ते महात्मा', खंड पहिला, राजहंस प्रकाशन, पुणे,
६. पवार जयसिंगराव, (संपा), (२०१९),'राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारकग्रंथ', खंड: एक, दोन आणि तीन, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.
७. पवार जयसिंगराव, (संपा), (२०१९),'राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ', खंड: चार आणि पाच, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.
८. पवार जे. के., (२०१८), 'राजर्षी शाहूंची अर्थनीती', राज प्रकाशन, कोल्हापूर,